**राज्यातील अनुसूचित जमातीच्या इ. १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता "सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना" लागू करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
शासन शुध्दीपत्र क्रमांक : आविशि-२००९/प्र.क्र.२०/का.१२
मंत्रालय विस्तार, मुंबई-३२.
दिनांक : २६ ऑगस्ट, २०१०.

**वाचा** :- शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : आविशि-२००९/प्र.क्र.२०/का.१२, दिनांक : ३१ मे, २०१०.

**शासन शुध्दीपत्रक** -राज्यातील अनुसूचित जमातीच्या इ. १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता "सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना" उपरोक्त शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४ मध्ये सदर योजनेची कार्यपध्दती नमूद केली आहे. त्यातील ४(४) व ४(६) खालीलप्रमाणे वाचावे :-

२. ४(४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यांचेकडे प्रस्ताव सादर करतांना शाळेच्या मुख्याध्यापकाने विद्यार्थ्यांच्या शाळेत असलेल्या नोंदवहीवरुन विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असल्याचे प्रमाणित करणे आवश्यक राहील.

३. ४(६) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी शिष्यवृत्ती वाटप करण्यासाठी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला जास्तीत जास्त ३० जुन, पर्यंत पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांना, त्यांच्या सोयीनुसार कोणत्याही बँकेत खाते उघडण्याच्या सुचना द्याव्यात.

४. तसेच परिशिष्ट अ मधील मुद्याक्रमांक ३(४) मध्ये सुधारणा करण्यात येत असून कुटुंबाच्या एकूण वार्षिक उत्पन्नाबाबत ग्रामपंचायतीकडील उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यात यावा.

५. सदर योजना सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात आली असल्याने योजनेच्या कार्यपध्दतीमधील परिच्छेद क्र.४.(५) अन्वये निश्चित केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१०-११ पुरते, प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना सादर करण्यास ३१ डिसेंबर, २०१० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तथापि, पुढील शैक्षणिक वर्षापासून परिच्छेद क्र.४.(५) व परिच्छेद क्र.४.(८) मधील वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदर शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१००८२६१३१९०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( र. प्र. आटे )
शासनाचे अवर सचिव

**प्रति,**

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक (५ प्रती)
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
विभागीय आयुक्त, नाशिक/पुणे/औरंगाबाद/नागपूर.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/नागपूर/अमरावती
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
विभागीय शिक्षण सह संचालक,नाशिक/पुणे/औरंगाबाद/नागपूर.
वित्त विभाग (व्यय-१४/अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई.
मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
सर्व सह सचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग.
निवड नस्ती, (का.१२ ),आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई